**MHST0500 0445 2008**

**नियमित दि.मु.क्र.३१०/२००८ मधील निशाणी क्र.१७१ वरील आदेश**

**१. श्रीरंग बाजी माळी मयत वारस**

**१अ. सुभद्रा श्रीरंग माळी व इतर**

**वि.**

**१. विलास सखाराम जाधव व इतर**

**वादीतर्फे विधीज्ञ – श्री. ए. आर. निकम.**

**प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री. आर. सी. शहा.**

**निशाणी १७१ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.३ याने वादी क्र.१ब हे मयत झाल्याने त्यांच्याविरूध्द अवसान झालेला दावा बाजूला सारून मिळावा यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्याच अर्जावर प्रतिवादी यांचे विधीज्ञ यांनी स्वहस्ताक्षरात दिलेले सविस्तर लेखी म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद लक्षात घेतला.

०३. प्रस्तुत अर्जातील कथनावरून असे दिसून येते की, वादी क्र.१ब हे दि.२१/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुत दावा व नि.दि.मु.क्र.२३३/२००९ एकत्र करणेकरीता सातारा येथील मा. जिल्हा न्यायाधीश यांच्याकडे हस्तांतर अर्ज क्र.४९/२०२४ हा चालू असल्यामुळे वादींना मयत वादीचे वारस अभिलेखावर विहीत मुदतीमध्ये घेता आलेले नाहीत. परिणामी वादी क्र.१ब विरूध्द दावा हा अवसान झालेला आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ब विरूध्द अवसान झालेला दावा बाजूला सारून मिळावा याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे देवून अर्ज मंजूर करण्यास हरकती नोंदविलेल्या आहेत.

४. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरूध्द निरंतर ताकीद मनाई आदेश मिळावा या व इतर मागण्यांकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना लागल्यानंतर त्यांनी न्यायालयात

हजर होवून म्हणणे दाखल केलेले आहे. या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी वादमुद्यांची निश्चिती केलेली आहे. वादीतर्फे पुरावा बंद झाल्यानंतर प्रतिवादी यांच्यातर्फे देखील पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे. प्रकरणाची कार्यवाही चौकशीकामी प्रलंबित असताना वादी क्र.१ब हे दि.२१/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्याबाबतचा मृत्यूचा दाखला नि.क्र.१७६ च्या यादीसमवेत अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा दाखला वादी क्र.३ श्री. युवराज बाजी माळी याने नि.क्र.१७० वर जे प्रतिज्ञापत्र केले आहे त्या प्रतिज्ञापत्रातील कथन की, वादी क्र.१ब हे दि.२१/०१/२०२४ रोजी मयत झाले या कथनास पुष्टी व दुजोरा देतो. तसेच, वादी क्र.३ याने शपथेवर प्रस्तुतचा अर्ज दाखल का करावा लागला याबाबत सविस्तर व समधानकारक स्पष्टीकरण दिलेले आहे. आवश्यक ते अर्ज वादी यांनी विहीत मुदतीमध्ये दिलेले नसल्यामुळे वादी क्र.१ब विरूध्द दावा हा अवसान झालेला आहे असे समजण्यात येते. वादी क्र.३ यांनी प्रतिज्ञापत्र देवून रामचंद्र – वादी क्र.१ब हा मयत असल्याचे, सदरचा अर्ज विलंबाने दाखल करण्याची कारणे व वारसदार अभिलेखावर घेण्याची कारणे शपथेवर सांगितले आहे. मयत वादी क्र.१ब नंतर उर्वरीत वादी व मयताचे वारस यांच्या बाजूने दावा टिकून राहतो. मयताचे वारस हे आवश्यक व योग्य ते पक्षकार आहेत. त्या सर्व कारणांचा विचार करता अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी १७१) चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत वादी क्र.१ब याचे विरूध्द अवसान झालेला दावा/ आदेश बाजूला सारण्यात येत आहे.

SUDHIR BALASAHEB TODKAR

Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2025.03.05 11:03:48 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः ०३/०३/२०२५ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.